# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक ३१/०३/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## उमरेड येथे घरफोडी करणारे आरोपी गजाआड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—



दिनांक ३१/०१/२०२२ रोजी फिर्यादी नामे अमोल धरनराजजी वासेकर, वय ३६ वर्ष, रा. शिवापुर, यांचे घराचे कडीकोंडा तोडुन अज्ञात आरोपींनी आत प्रवेश करून बेडरूम मधील आलमारीचे लॉकर मध्ये ठेवलेले सोने चांदीचे दागीने, सोनाटा घडी व नगदी २०,०००/—रू. असा एकुण १,२८,०००/—रू. चा माल चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन उमरेड अप.क्र. ६४/२२ कलम ४५७,३८० भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचा समांतर तपास मा. पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर सा., नागपुर ग्रामिण यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. ओमप्रकाश कोकाटे स्था.गु. ा.ना.ग्रा. व त्यांचे पथकाने सुरू केला व घटने तारखे पासुन सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध सुरू केला. दरम्यान दिनांक ३०/०३/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर पथकाने सापळा रचुन नागपुर शहर येथुन दोन संशयीत इसम नामे १) जाबीर रज्जाक शेख, वय २८ वर्ष, रा. हनुमान नगर, गोरेवाडा रोड, पिटासुर नागपुर व २) शुभम मनिराम चुटे, वय २३ वर्ष, रा. पटेल किराणा दुकाना जवळ, इंदीरा माता नगर, नागपुर यांना ताब्यात घेवुन त्यांना सखोल विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची तसेच सदर गुन्हा करते वेळी त्यांचा साथीदार शाबीर रज्जाक शेख, रा. नागपुर हा सुध्दा त्यांचे सोबत असल्याचे त्यांनी सांगीतले. ताब्यात घेतलेले दोन्ही आरोपीतांचे ताब्यातुन एक जुना मोबाइल व सदर गुन्हयातील चोरी केलेले नगदी पैकी ५,०००/—रू. जप्त करण्यात आले असुन आरोपीतांची वैद्यकीय तपासणी करुन जप्त मृद्देमालासह त्यांना पुढील तपासकामी पोलीस स्टेशन उमरेड यांचे ताब्यात दिलेले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन उमरेड करीत आहेत.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार मदन आसटकर, नरेंद्र पटले, गजेंद्र चौधरी, पोना रोहन डाखोरे, अजिज दुधकनोज, बालाजी साखरे, चालक साहेबराव बहाले, अमोल कुथे व सायबर सेलचे सतिष राठोड यांचे पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर